तात्काळ/कालमर्यादा

महाराष्ट्रशासन

**अपर पोलीस महासंचालक व संचालक,**
**पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्रराज्य, पुणेयांचेकार्यालय, चव्हाणनगर, पाषाणरोड, पुणे-411 008**
Email: hcbbranch@mahpolwireless.gov.inWebsite : mahpolwireless.gov.in
FAX No: 020-25657974 Ph.No. 02025656908(O) 020-25652505(GEN)

पुणे, दिनांक : ०९/०२/२०२४

क्र.आस्था-२/ई-४/कार्यमुक्त/पोशि(कम)पाटील/२०२४ ३९६

**विषय :-** कार्यमुक्त करणेबाबत
पोशि (कर्मशाळा मदतनीस) मनोज बाजीराव पाटील नेमणूक बि.सं.विभाग, नवी मुंबई

**संदर्भ :-** १) महाराष्ट्र नागरी सेवा(सेवेच्या सर्वसाधारण शर्ती)(सुधारित नियम २०२१) नियम १९८१वित्तीय प्रकाशन दिनांक ३०/१२/२०२१
२) पोशि (कर्मशाळा मदतनीस) मनोज बाजीराव पाटील यांचा दि.१७/०१/२०२४ रोजीचा विनंती अर्ज
३) महाराष्ट्र शासन, सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय,पुणे यांचेकडील पत्र क्रअ-१/आस्था/पदभरती/२०२४/४८६, दिनांक १५/०१/२०२४

--- ००० ---

**कार्यालयीन आदेश :-**

श्री. मनोज बाजीराव पाटील, पोशि (कर्मशाळा मदतनीस), नेम. पोलीस आयुक्त, कार्यालय नवी मुंबई, यांची अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयात पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) या पदावर सरळसेवा मार्गाने इमाव या प्रवर्गातून दिनांक २२/०८/२०१६ रोजी नियुक्ती झालेली असून, सदर पदावर त्यांची ७ वर्षे ०५ महिने इतकी सेवा पूर्ण झालेली आहे. तसेच, त्यांना स्थायित्व लाभ प्रमाणपत्र मिळालेले असून त्यांनी या संवर्गाच्या सेवा प्रवेश नियमात नमूद केलेल्या सर्व अर्हतांची पूर्तता केली आहे. त्याचप्रमाणे त्यांचे या संवर्गाच्या सेवाकालावधीत प्रतिवर्षीच्या कार्यमुल्यमापन अहवालातील गुणांकन किमान ६ असून त्यांच्या विरूध्द कोणतीही विभागीय चौकशी/न्यायालयीन प्रकरण चालू अथवा प्रस्तावित नाही.

२. संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये महाराष्ट्र शासन, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत कार्यरत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण, संस्था, सोलापूर, विजापूर रोड, सोलापूर, पिन-४१३००४ कार्यालयाने, त्यांच्या कार्यालयात शिल्प निर्देशक (पेंटर जनरल ) संवर्गाचे सरळसेवा कोट्यातील खुला या प्रवर्गाचे पद उपलब्ध असल्याने, त्या पदावर श्री. मनोज बाजीराव पाटील, पोशि (कर्मशाळा मदतनीस) यांचे नियुक्तीसाठी हरकत नसल्याचे कळविले आहे.

३. श्री. मनोज बाजीराव पाटील, पोशि (कर्मशाळा मदतनीस), यांनी संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयातील तरतूदीनूसार त्यांच्या संदर्भ क्र.२ येथील दि.१७/०१/२०२४ च्या अर्जान्वये सरळसेवेने नियुक्ती या कारणास्तव त्यांचे अन्य विभागातील महाराष्ट्र शासन, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत कार्यरत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण, संस्था, सोलापूर, विजापूर रोड, सोलापूर, पिन-४१३००४ या कार्यालयातील शिल्प निर्देशक (पेंटर जनरल ) या पदावर कायमस्वरुपी समावेशन करण्याची विनंती केली आहे.

४. श्री. मनोज बाजीराव पाटील, पोशि (कर्मशाळा मदतनीस), यांनी संदर्भ क्र.१ मध्ये नमूद शासन निर्णयात विहीत केलेल्या सर्व अटी मान्य असल्याचे लेखी स्वरुपात इकडील कार्यालयास हमीपत्र सादर केलेले आहे. तसेच, त्यांना या कार्यालयाकडे परत येण्यासाठी अर्ज करता येणार नाही.

५. श्री. मनोज बाजीराव पाटील, पोशि (कर्मशाळा मदतनीस) यांना, त्यांच्या विनंतीवरुन महाराष्ट्र शासन, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत कार्यरत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण, संस्था, सोलापूर, विजापूर रोड, सोलापूर, कार्यालयाच्या शिल्प निर्देशक (पेंटर जनरल) या पदावर मोकळीक केलेनंतर त्यांचा पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) या पदावर कोणताही धारणाधिकार राहणार नाही या हमीपत्राच्या आधारे नवीन नियुक्ती ठिकाणी दिनांक ०९/०२/२०२४ रोजी म.नं.पासून कार्यमुक्त करण्यात येत आहे.

(मा.संचालक यांचे मान्यतेने)

( सितासाम जाधव )
पोलीस उप अधीक्षक बिनतारी संदेश (प्रशासन),
अपर पोलीस महासंचालक व संचालक कार्यालय,
पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति पोलीस आयुक्त, नवी मुंबई.
(श्री. मनोज बाजीराव पाटील यांना नवीन नियुक्ती ठिकाणी मोकळीक करुन पुर्तता अहवाल सादर करण्यात यावा ही विनंती. तसेच त्यांचे नाव सर्व शासकीय अभिलेखावरुन कमी करण्यात यावे. सोबत मुळ सेवापट सादर.)
श्री. मनोज बाजीराव पाटील, पोशि (कर्मशाळा मदतनीस), नेम. पोलीस आयुक्त, कार्यालय नवी मुंबई

प्रत पोलीस अधीक्षक बि.सं., पश्चिम विभाग, पुणे.
पोलीस उप अधिक्षक, बि.सं.परवाना शाखा, संचालक कार्या.पुणे, प्रसिध्दीसाठी/
सहायक पोलीस आयुक्त, बि.सं., नवी मुंबई.
(श्री.म.बा.पाटील याचेकडून शासकीय ओळखपत्र जमा करुन घेणेत यावे.)

E:\E - 4\सेवानिवृत्ती\सेवेतून कार्यमुक्त करणे\Rajinama ISM.docx